सकाळ

बंद्यांच्या पुनर्वसनासाठी कौशल्य विकासाचा हातभार

'फिनोलेक्स, मुकुल माधव'चा पुढाकार; शिकले प्लंबिंगचे कौशल्य

■ सकाळ वृत्तसेवा

रत्नागिरी, ता. २७ : बंद्यांचे पुनर्वसन, कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि त्यांच्या सीएसआर भागीदार मुकुल माधव फाउंडेशन यांच्या पुढाकाराने रत्नागिरी जिल्हा कारागृहातील बंद्यांसाठी ८० तासांचा प्लंबिंग कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्यात आला.

प्रशिक्षण कार्यक्रमाची सुरुवात १५ जून रोजी झाली. या कार्यक्रमासाठी एकूण २२ बंद्यांनी नोंदणी केली होती. त्यांपैकी प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या २५ बंद्यांना प्रमाणपत्र वितरण समारंभात स्किल इंडिया प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. हा उपक्रम जनशिक्षण संस्थान आणि रत्नागिरी जिल्हा कारागृह प्रशासन यांच्या सहकार्याने राबवण्यात आला.



रत्नागिरी : जिल्हा कारागृहात फिनोलेक्स इंडस्ट्रिज, मुकुल माधव फाउंडेशन व जनशिक्षण संस्थान आयोजित प्रशिक्षण प्रमाणपत्र वितरणावेळी बोलताना कारागृह अधीक्षक सचिन पाटील. सोबत डॉ. विनय नातू, निधी सावंत, अमृता शेटये आणि शिकाजी नाटेकर व फिनोलेक्सचे अधिकारी आदी.

बंद्यांना प्लंबिंगचे व्यावहारिक ज्ञान व कौशल्य प्राप्त करून देणे, तसेच कारागृहातून मुक्त झाल्यानंतर रोजगार किंवा स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबनाची संधी उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या कार्यक्रमाला रत्नागिरी जिल्हा कारागृहाचे अधीक्षक सचिन पाटील यांच्यासह कारागृहातील अधिकारी उपस्थित होते. जनशिक्षण संस्थानचे अध्यक्ष तथा गुहागरचे माजी आमदार डॉ. विनय नातू, संस्थेच्या निधी सावंत, अमृता शेटये आणि प्लंबिंग प्रशिक्षणाचे प्रशिक्षक शिकाजी नाटेकर उपस्थित होते. फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि मुकुल माधव फाउंडेशनच्या वतीने वरिष्ठ व्यवस्थापक एस. रवींद्रन्, नंदकिशोर शिंपी आणि शामराव निंबाळकर यांनी कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवली.

सामाजिक उपक्रमातून परिवर्तन

■ बंद्यांना कौशल्याधारित प्रशिक्षण देऊन त्यांचे पुनर्वसन करणे, समाजाच्या मुख्य प्रवाहात त्यांचे पुनर्समावेशन घडवून आणणे आणि त्यांना सन्मानाने व स्वावलंबी जीवन जगण्यासाठी सक्षम करणे, या सामाजिक बांधिलकीच्या दिशेने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे. फिनोलेक्स इंडस्ट्रिज, मुकुल माधव फाउंडेशन, जनशिक्षण संस्थान आणि रत्नागिरी जिल्हा कारागृह प्रशासनाच्या संयुक्त प्रयत्नांतून सामाजिक परिवर्तनाला चालना देण्याचा हा सकारात्मक प्रयत्न आहे, असे डॉ. विनय नातू यांनी सांगितले.

Ratnagiri, Ratnagiri-Today
28/10/2025 Page No. 3